सत्यमेव जयते

# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,

महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
(महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र राज्य)
रायगडभवन,सीबीडी,बेलापूर,नवी मुंबई 400614
Email icdsest21@gmail.com Tel. No.022-27576388,322,323 Fax 022-27576324

जाक्र/ एबाविसेयोआ/मुसे-मविप/पदो-को-नि.भरती /2025-26/2175 / नवी-मुंबई दिः 28 APR 2025

**अत्यंत महत्वाचे**

प्रति,
विभागिय उपआयुक्त,
महिला व बाल विकास,
कोकण,पुणे, नाशिक,छ.संभाजीनगर, अमरावती व नागपूर विभाग .

**विषय : सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती कोटयातील निवडीने या प्रकारातील रिक्त पद भरती परिक्षा मार्गदर्शन बाबत -**

**संदर्भ** : 1. महाराष्ट्र शासन राजपत्र ,महिला व बाल विकास विभाग ,नविन प्रशासकिय भवन,मंत्रालय मुंबई दिनांक : 4 जून 2021

2. महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग ,नविन प्रशासकिय भवन,मंत्रालय मुंबई शासन अधिसुचना दिनांक : 8 मे 2023
3. महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास विभाग ,मंत्रालय मुंबई शासन पत्र MWC-07011(12) /19/ 2022-DESK-7(-587170) दि. 8 एप्रिल 2024
4. महिला व बाल विकास विभाग , शासन पत्र क्र.मबाआ-2021/प्र.क्र.22/का-7 दि.5 सप्टेंबर-2024
5. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोटयातील रिक्त पदभरती पत्र क्र.560 दिनांक 4 फेब्रूवारी 2025.
6. या आयुक्तालयाचे पदोन्नती कोटयातील रिक्त पदभरती पत्र क्र.2018 दिनांक 11 एप्रिल 2025
7. विभागीय उप आयुक्त, पुणे विभाग यांचे पत्र क्र. 698 दि. 22.04.2025
8. विभागीय उप आयुक्त, छ.संभाजीनगर यांचे पत्र क्र.867 दिनांक 21.04.2025
9. विभागीय उप आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. 543 दिनांक 23.04.2025
10. अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका पदोन्नती पात्रतेच्या अनुषंगाने या आयुक्तालयास प्राप्त अभिवेदने.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते कि, उपरोक्त संदर्भ क्र. 6 नुसार या आयुक्त कार्यालयाचे पत्रान्वये अंगणवाडी सेविका ते मुख्यसेविका या पदोन्नतीस पात्र अंगणवाडी सेविका यांना 10 वर्षे नियमित सेवा, वय वर्षे 45 च्या आत, मान्यता प्राप्त / संविधानिक विद्यापीठाची पदवी , हिंदी व मराठी भाषा सूट व संगणक अर्हता या बाबत एकत्रीत व सुधारित प्रमाणपत्र देणे बाबत 104 नागरी प्रकल्प कार्यालयांना विभागीय उप आयुक्त यांचे मार्फत कळविण्यात आलेले होते . त्याच प्रमाणे प्रकल्प स्तरावर एकत्रीत प्रमाणपत्र नाकारल्यास संबंधित अंगणवाडी सेविका यांना विभागीय उप आयुक्त यांचेकडे अपील अर्ज करण्या बाबत सुचना देण्यात आलेल्या होत्या . सदर विषयाच्या अनुषंगाने वरील संदर्भ क्र. 7 ते 10 अन्वये कारणपरत्वे एकत्रीत प्रमाणपत्र देणे बाबत या आयुक्तालयास मार्गदर्शन मिळणे बाबत विनंती करण्यात आलेली आहे.

**सदर विषयाच्या अनुषंगाने महिला व बाल विकास विभाग, मुख्यसेविका / पर्यवेक्षिका (गट-क) या पदावर निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परिक्षा नियम 2023 शासन अधिसुचना दिनांक 8 मे 2023 मधील अ.क्र. 3 मर्यादित परिक्षेस बसण्यासाठी खालील प्रमाणे अंगणवाडी सेविका पात्र राहतील** - (अ.क्र.1 ते 6 चे **अवलोकन करावे)**

1. दिनांक 1 जानेवारी 2025 रोजी 10 वर्षे नियमित सेवा पुर्ण व सध्या कार्यरत सेविका
2. दिनांक 1 जानेवारी 2025 रोजी ज्यांचे वय वर्षे 45 च्या आत आहे .
3. दि.1 जानेवारी 2025 मान्यता प्राप्त/ संविधानिक विद्यापिठाची पदवी पुर्ण आहे .
4. दि.1 जानेवारी 2025 रोजी एतदर्थ मंडळाने विहित केलेल्या नियमातील विद्यमान तरतूदी नुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा पास अथवा सुटीस पात्र आहे. (सद्य स्थितीत कोणत्याही दिनांकास हिंदी व मराठी भाषा परीक्षा पास सूटीचा आदेश काढला असला तरी , ज्या दिनांकास हिंदी व मराठी भाषासह शालांत परीक्षा पास झाले असतील व सेवेत असतील अथवा हिंदी व मराठी भाषा एतदर्थ मंडळाची परीक्षा पास असतील त्या दिनांका पासून पुर्वलक्षी प्रभावाने त्यांना परीक्षा सूट लागू राहील)
5. दिनांक. 1 जानेवारी 2025 रोजी एम.एस.सी.आय.टी. अथवा समकक्ष अर्हता (माहिती व तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) शासन निर्णय दिनांक .4.2.2013 नुसार संगणक अर्हता कोर्स)
6. त्याच प्रमाणे सदरील पदे ,महिला व बाल विकास विभाग ,मंत्रालय मुंबई शासन पत्र MWC-07011(12)/19/2022-DESK-7 (-587170) दि. 8 एप्रिल 2024 नुसार सर्व पदे खुल्या प्रवर्गातून भरण्यात येणार असून सदरची निवडीने नियुक्ती ही मा. सर्वोच्च न्यालयातील प्रलंबीत विशेष अनुमती याचिका क्र. 28306/2017 मधील न्याय निर्णयाच्या अधिन राहून निवडीने नियुक्ती देण्यात येणार आहेत. **सदर प्रकरणी पुन:श्च उक्त संदर्भ क्र.** 1,2 **व** 3 **आपले अवलोकनास्तव या सोबत देण्यात येत असून त्या नुसार कार्यवाही करण्यात यावी** .

कैलास पगारे, (**भा.प्र.से.**)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई.

**प्रत: माहिती व कार्यवाहीस्तव -**

1. मा.सचिव,महिला व बाल विकास विभाग , मंत्रालय मुंबई यांचे माहितीस्तव सविनय सादर .
2. बाल विकास प्रकलप अधिकारी , नागरी प्रकल्प सर्व 104 यांना कार्यवाहीस्तव

आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य ,नवी मुंबई

# महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक. ०४ जून, २०२१

## अधिसुचना

भारताचे संविधान

क्रमांक **मबाआ-२०१४/प्र. क्र.२७८/का-७,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विदयमान नियम, आदेश व संलेख अधिक्रमीत करून महाराष्ट्राचे राज्यपाल याव्दारे, महाराष्ट्र शासनाच्या, महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **जिल्हा परिविक्षा अधिकारी , अधिक्षक/अधिक्षिका, निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ) , मुख्य अधिकारी ,कार्यकारी सचिव (जिपअ संवर्ग), कार्यालय अधिक्षक, परिविक्षा अधिकारी, उपअधिक्षक, सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा, प्रमुख लिपीक, अधिक्षक, वरिष्ठ लिपीक ,सांख्यिकी सहायक,कनिष्ठ लिपीक, कनिष्ठ सहायक** व एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **मुख्यसेविका किंवा पर्यवेक्षिका** या गट क मधील पदावरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम तयार करीत आहेत:-

१. या नियमांना, महिला व बाल विकास आयुक्तालय आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **गट-क** मधील या पदांचे सेवा प्रवेश नियम २०२१ असे म्हणावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) "**आयुक्तालय**" याचा अर्थ महिला व बाल विकास आयुक्तालय असा आहे.

(ख) "**पदवी**" याचा अर्थ सांविधानिक विदयापीठाची पदवी असा आहे.

(ग) "**विभाग**" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा महिला व बाल विकास विभाग असा आहे.

(घ) "**शासन**" याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

३. **आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील जिल्हा परिविक्षा अधिकारी, अधिक्षक,अधिक्षिका, निरीक्षक प्रमाणित शाळा व संस्था (कनिष्ठ), मुख्य अधिकारी, कार्यकारी सचिव (जिपअ संवर्ग) या पदावरील नियुक्ती ;-**

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **परिविक्षा अधिकारी / उपअधिक्षक किंवा सहायक निरीक्षक प्रमाणित** शाळा पद धारण करणा-या व्यक्तींच्या एकत्रित जेष्ठता सूचीमधून व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या योग्यतेच्या अधीनतेने व जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीव्दारे करण्यात येईल.

४. आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **कार्यालय अधिक्षक या पदावरील नियुक्ती** ;-

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **प्रमुख लिपीक /अधिक्षक** पद धारण करणा-या व्यक्तींच्या एकत्रित जेष्ठता सूचीमधून व त्या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या योग्यतेच्या अधीनतेने व जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीव्दारे करण्यात येईल.

५. (१) आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **परिविक्षा अधिकारी /उपअधिक्षक किंवा सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा या पदावरील नियुक्ती** ;-

(क) पुढील उमेदवारांमधून पदोन्नतीद्वारे,-

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **मुख्यसेविका** हे पद धारण करणा-या व त्या संवर्गात तीन वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा पूर्ण करणा-या तसेच सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तींच्या एकत्रित जेष्ठता सूचीमधून योग्यतेच्या अधीनतेने व जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीव्दारे करण्यात येईल,

किंवा,

(ख) पुढील उमेदवारांमधून निवडीद्वारे,-

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक** हे पद धारण करणाऱ्या व त्या संवर्गात पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पुर्ण करणा-या तसेच सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीमधून मर्यादीत विभागीय परिक्षेच्या निकालाच्या आधारे तयार केलेल्या गुणवत्ता यादीतील गुणवत्तेच्या आधारे योग्य व्यक्तींच्या निवडीद्वारे करण्यात येईल,

किंवा,

(ग) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे, -

(एक) ज्यांचे एकवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या, परंतु आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत वयाची मर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केली असेल.

(२) या नियमाच्या उप नियम (१) येथे नमूद केलेल्या आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील परिविक्षा अधिकारी /उपअधिक्षक किंवा सहायक निरीक्षक प्रमाणित शाळा या पदावर पदोन्नतीने,निवड पध्दतीने व नामनिर्देशनाने करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण २५:२५:५० असे राहील.

६. आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **प्रमुख लिपीक/अधिक्षक या पदावरील नियुक्ती**; -

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक** पद धारण करणा-या व सदर पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पुर्ण करणा-या व्यक्तींच्या एकत्रित जेष्ठता सूचीमधून योग्यतेच्या अधीनतेने, जेष्ठतेच्या आधारे व अर्हताकारी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या योग्य व्यक्तीची पदोन्नतीव्दारे नियुक्ती करण्यात येईल.

७. (१) **एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत** गट-"क" मधील **मुख्यसेविका /पर्यवेक्षिका** या पदावरील नियुक्ती एकतर;-

(क) पुढील उमेदवारांमधून निवडीद्वारे,-

**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत "मानसेवी अंगणवाडी सेविका"** किंवा **"मिनी अंगणवाडी सेविका"** या पदावर कार्यरत असणाऱ्या दहा वर्षाहून कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या आणि ४५ वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या व या नियमातील पोट नियम (ख) (दोन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या महिला उमेदवारांमधून मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणांकानुसार निवडीव्दारे करण्यात येईल.

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे -

(एक) ज्यांचे एकवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या, परंतु आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत वयाची मर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केली असेल.

(२) या नियमाच्या उप नियम (१) येथे नमूद केलेल्या आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **मुख्यसेविका /पर्यवेक्षिका** पदांवरील नियुक्ती ही नामनिर्देशनाने व निवडीव्दारे अनुक्रमे प्रमाण ५०:५० असेल.

८. (१) आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक** या पदावरील नियुक्ती एकतर;-

(क) पुढील उमेदवारांमधून पदोन्नतीद्वारे, -

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **कनिष्ठ लिपीक / कनिष्ठ सहायक** हे पद धारण करणा-या व त्या संवर्गात तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पुर्ण करणाऱ्या एकत्रित सेवाजेष्ठता सूचीमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे, योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीव्दारे करण्यात येईल.

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे,-

(एक) ज्यांचे एकवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या, परंतु आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत वयाची मर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केली असेल.

(२) या नियमाच्या उप नियम (१) येथे नमूद केलेल्या आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **वरिष्ठ लिपीक /सांख्यिकी सहायक** या पदांवरील नियुक्ती पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ५०:५० प्रमाण असेल.

९. (१) आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील गट-"क" मधील **कनिष्ठ लिपीक / कनिष्ठ सहायक** या पदावरील नियुक्ती-

(क) पुढील उमेदवारांमधून पदोन्नतीद्वारे,-

आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **" गट- ड "** मधील कोणतेही पद धारण करणा-या व त्या पदावर ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा पुर्ण केलेल्या व या नियमातील खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणा-या व्यक्तीच्या एकत्रित सेवाजेष्ठता सूचीमधून मधून जेष्ठतेच्या अधिन, पात्रता या निकषावर योग्य व्यक्तींच्या पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल,

किंवा

(ख) पुढील उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे;-

(एक) ज्यांचे एकवीस वर्षापेक्षा कमी वय नसलेल्या आणि अडतीस वर्षापेक्षा जास्त वय नसलेल्या, परंतु आरक्षित प्रवर्गातील व्यक्तींच्या बाबतीत वयाची मर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) ज्यांनी पदवी धारण केली असेल. आणि

(तीन) ज्यांनी मराठी टंकलेखनाचे किमान ३० श.प्र.मि. वेग मर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० श.प्र.मि. वेग मर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र धारण केलेले आहे,

किंवा

(ग) अनुकंपा तत्वावर निवड करण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार, खंड (ख) च्या उप खंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करीत असलेल्या उमेदवारांची अनुकंपा तत्वावर नियुक्तीने;

किंवा

(घ) गट क मधील वाहन चालक या पदावर किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पुर्ण केलेल्या व खंड (ख) च्या उपखंड (दोन) व (तीन) मध्ये विहित केलेली अर्हता धारण करणा-या व कनिष्ठ लिपीक/कनिष्ठ सहायक पदावर येण्यास इच्छुकता दिलेल्या व्यक्तीमधून जेष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य व्यक्तींच्या कायमस्वरुपी संवर्ग बदलीने नियुक्ती देता येईल. वाहन चालक या पदावरुन नियुक्ती दिलेल्या व्यक्तीची कनिष्ठ लिपीक/कनिष्ठ सहायक पदावरील सेवाजेष्ठता कनिष्ठ लिपीक/कनिष्ठ सहायक पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून निश्चित करण्यात येईल.

(२) नियम ९ येथे नमुद केलेल्या पदावर पदोन्नतीने, अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसह नामनिर्देशनाने व वाहन चालकामधून कायमस्वरुपी बदलीने करावयाची नियुक्ती यांचे प्रमाण ४०:५०:१० असे राहील.

परंतु असे की, पदोन्नतीने किंवा वाहन चालकामधून कायम स्वरुपी बदलीने नियुक्तीसाठी विहीत अर्हता धारण करणारे उमदेवार उपलब्ध नसल्यास नियुक्ती प्राधिका-यांना पदोन्नतीचे व वाहन चालकामधून कायम स्वरुपी बदलीचे प्रमाण शिथील करुन उमेदवारांची नामनिर्देशनाने नियुक्तीकरता येईल.

१०. नियम ५, ७, ८ व ९ येथे नमुद केलेल्या पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने नियमानुसार "सेवाप्रवेशोत्तर परीक्षा" विहित कालावधीत व संधीत उत्तीर्ण व्हावे लागेल किंवा प्रचलित नियमानुसार सेवाप्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सुट मिळणे आवश्यक राहील.

११. नियम ३,४,५,६,७,८,९ येथे नमूद पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार सदर दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण केली असणे अथवा या दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील किंवा सदर दोन भाषा परीक्षा नियुक्तीपूर्वी उत्तीर्ण केलेल्या नसतील तर, दोन्ही भाषा परीक्षा नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील अन्यथा विहित मुदतीनंतर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

१२. नियम ३,४,५,६,७,८,९ येथे नमूद पदावर नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा सदर प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील किंवा संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. अन्यथा संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

१३. नियम ५,७,८,९ येथे नमूद पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमानुसार, नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील अन्यथा सदर व्यक्ती शासकीय सेवेसाठी अनर्ह ठरेल.

१४. नियम ३, ४, ५, ६, ७, ८ व ९ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेले व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली केली जाण्यास पात्र असतील.

(र.सि.जरांडे)
शासनाचे उपसचिव.

महिला व बाल विकास विभाग
नवीन प्रशासन भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: ८ मे, २०२३.

अधिसूचना

भारताचे संविधान,

क्रमांक मबाआ-२०२१/प्र.क्र.४०/का-७.- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल याद्वारे, महिला आणि बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालयांतर्गत मुख्यसेविका/पर्यवेक्षिका '(गट-क)' या पदावर निवडीने नियुक्तीकरिता मर्यादित विभागीय परीक्षेसाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत:-

१. संक्षिप्त नावः- या नियमांना मुख्यसेविका/पर्यवेक्षिका '(गट-क)' या पदावर निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परीक्षा नियम, २०२३" असे म्हणावे.

२. व्याख्या:- या नियमांत संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,-

(क) "आयुक्तालय" याचा अर्थ आयुक्त, महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय.

(ख) "विभाग" याचा अर्थ, महिला व बाल विकास विभाग.

(ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(घ) "मर्यादीत विभागीय परीक्षा" याचा अर्थ, महिला व बाल विकास विभागांतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजनेतंर्गत मानसेवी अंगणवाडी सेविका किंवा मिनी अंगणवाडी सेविका या निम्न संवर्गामधून मुख्यसेविका/पर्यवेक्षिका '(गट-क)' पदावर निवडीने नियुक्तीसाठी घेण्यात येणारी मर्यादित विभागीय परीक्षा असा आहे:

३. मर्यादीत विभागीय परीक्षेसाठी पात्र व्यक्ती:- खालील व्यक्ती विभागीय परीक्षेस बसण्यास पात्र आहेत.

(१) मर्यादित विभागीय परीक्षेसाठी अंगणवाडी सेविका किंवा मिनी अंगणवाडी सेविका या पदावरील खालील पात्रता धारण करणाऱ्या व्यक्ती अर्ज करु शकतील :-

(२) ज्यावर्षी मर्यादीत विभागीय परीक्षेचे आयोजन करणे प्रस्तावित आहे, त्या वर्षाच्या १ जानेवारी रोजी सलग दहा वर्षे विनाखंड नियमित सेवा पूर्ण केलेल्या व संवैधानिक विद्यापीठाची पदवी धारण केलेल्या व्यक्ती;

स्पष्टीकरण:- या नियमाखाली दहा वर्षाची नियमित सेवेची गणना करताना,-

(३) अंगणवाडी सेविका/मिनी अंगणवाडी सेविका पदावरील नियमित नियुक्तीचा दिनांक.

(४) अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेल्या व्यक्तीसांठी, सेवा नियमित झालेल्या दिनांकापासून

(५) शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेली संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या व्यक्ती;

(६) एतदर्थ मंडळाने विहित केलेल्या नियमातील तरतुदीनुसार ज्या व्यक्ती हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण झालेल्या आहेत किंवा त्यांनी यापूर्वीच सदर परीक्षा उत्तीर्ण केली आहे वा सदर परीक्षा देण्यापासून सूट देण्यात आलेली आहे.

(७) परीक्षेच्या जाहिरातीच्या दिनांकास जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त असलेला कर्मचारी परीक्षेकरीता पात्र राहील.

४. मर्यादीत विभागीय परीक्षा:- (१) मर्यादीत विभागीय परीक्षा आयुक्तालयामार्फत घेण्यात येईल. त्यानुसार मर्यादित विभागीय परीक्षेच्या निकालाच्या आधारे तयार केलेल्या सामायिक गुणवत्ता यादीच्या आधारे निवड करण्यात येईल.

(२) मर्यादीत विभागीय परीक्षेसाठी या नियमांसोबतच्या परिशिष्ट नुसार एक प्रश्नपत्रिका असेल.

(३) सदर प्रश्नपत्रिकेसाठी १०० प्रश्न व प्रत्येकी २ गुण प्रमाणे एकुण २०० गुण आणि दिड तास (९० मिनिटांचा) कालावधी असेल.

(४) मर्यादीत विभागीय परीक्षेसाठी या नियमांसोबतच्या परिशिष्ट मधील अभ्यासक्रमावर आधारित वस्तूनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची प्रश्नपत्रिका असेल.

५. परिक्षा उत्तीर्ण होण्याची अर्हता:- एकूण गुणांपैकी किमान ५०% गुण पात्रतेसाठी आवश्यक राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

शासनाचे उपसचिव

मर्यादीत विभागीय परीक्षा योजना व अभ्यासक्रम:-

| प्रश्नपत्रिका | विषय | स्तर | माध्यम | प्रश्न | गुण | कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सर्वसाधारण विषय | इंग्रजी | १० वी | इंग्रजी | १० | २० | दीड तास | वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी |
| | मराठी | १० वी | मराठी | २० | ४० | | |
| | सामान्य ज्ञान, संख्यात्मक आणि तर्कशुद्ध चाचणी | १२ वी | मराठी | ४० | ८० | | |
| विभागाचे विषय | महिला व बाल विकास आयुक्तालयांतर्गत अंमलबजावणी करण्यात येत असलेले .कायदे व योजना | --- | | ३० | ६० | | |
| | | | | | एकुण २०० | | |

शासनाचे उपसचिव

मंत्रालयीन सेवा

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू
चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र.०२२- २२८८०३११
मेल आयडी - wcd-desk07@gov.in

---

MWC-07011(12)/19/2022-DESK 07 (E- 587170) दिनांक:-८ एप्रिल, २०२४.

प्रति,

| | | |
|---|---|---|
| १. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई | २. आयुक्त,एकात्मिक बालविकास सेवा योजना, आयुक्तालय,नवी मुंबई | ३.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद |

विषय:- अंगणवाडी सेविका संवर्गातून अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका संवर्गात निवडीने नियुक्ती करण्याबाबत मार्गदर्शन मिळण्याबाबत.

संदर्भ:- १. महिला व बाल विकास विभाग,शासन अधिसूचना दि.४.६.२०२१
२. महिला व बाल विकास विभाग, शासन अधिसूचना दि.८.५.२०२३
३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प. नागपूर यांचे अ. शा. पत्र क्र. १०६८, दि. ६.७.२०२२

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भाधिन शासन अधिसूचना व पत्राचे अवलोकन व्हावे. (प्रत सोबत जोडलेली आहे)

२. महिला व बाल विकास विभाग,शासन अधिसूचना दि.४.६.२०२१ अन्वये या विभागाच्या अधिपत्याखालील आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांच्या अंतर्गत मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदांचे सेवाप्रवेश नियम निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर सेवाप्रवेश नियमामध्ये मुख्यसेविका /पर्यवेक्षिका पदांवरील नियुक्ती ही नामनिर्देशनाने व निवडीव्दारे अनुक्रमे प्रमाण ५०:५० आहे. तरी अंगणवाडी सेविका या पदावरुन अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका या पदावर निवडीव्दारे नियुक्ती करण्याकरीता सरळसेवेकरीता लागू असलेल्या आरक्षणानुसार पदे भरण्यात यावी की पदोन्नती कोटयास लागू असलेल्या आरक्षणानुसार पदे भरण्यात यावी याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.नागपूर यांनी या विभागास केली होती.

तद्नुषंगाने सामान्य प्रशासन विभागास अभिप्राय देण्याची विनंती करण्यात आली होती.त्यावर सामान्य प्र[illegible] विभागाने, निवडीने नियुक्ती[illegible]याची पदे पदोन्नती कोटयातील समजून सामान्य

महाराष्ट्र राज्य नवी मुंबई
आवक क्रमांक- 267
दिनांक 16 APR 2024
कार्यासन

प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.७.५.२०२१ नुसार सर्व पदे खुल्या प्रवर्गातून भरावी.तथापि, सदरची निवडीने नियुक्ती ही मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून निवडीने नियुक्ती देण्यात यावी असे अभिप्राय दिले आहेत.

४. मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदावर निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परीक्षा नियम या विभागाच्या, शासन अधिसूचना दि.८.५.२०२३ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे.

५. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना कळविण्यात येते की, अंगणवाडी सेविका या पदावरुन अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका या पदावर निवडीव्दारे नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने परि.३ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार तात्काळ कार्यवाही करावी,ही विनंती.

आपला,

(वि. रा. ठाकूर)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव:-
उपआयुक्त (प्रशासन),एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,नवी मुंबई
सहायक आयुक्त (प्रशासन),एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,नवी मुंबई
सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मवबावि), जिल्हा परिषद
निवड नस्ती/का-७

प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि.७.५.२०२१ नुसार सर्व पदे खुल्या प्रवर्गातून भरावी.तथापि, सदरची निवडीने नियुक्ती ही मा.सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील न्यायनिर्णयाच्या अधीन राहून निवडीने नियुक्ती देण्यात यावी असे अभिप्राय दिले आहेत.

४. मुख्यसेविका/पर्यवेक्षिका या पदावर निवडीने नियुक्तीसाठी मर्यादित विभागीय परीक्षा नियम या विभागाच्या, शासन अधिसूचना दि.८.५.२०२३ अन्वये निश्चित करण्यात आलेली आहे.

५. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद यांना कळविण्यात येते की, अंगणवाडी सेविका या पदावरुन अंगणवाडी पर्यवेक्षिका/मुख्यसेविका या पदावर निवडीव्दारे नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने परि.३ मध्ये सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार तात्काळ कार्यवाही करावी,ही विनंती.

आपला,

१०/१८/२३

(वि. रा. ठाकूर)
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत माहितीस्त्तव व उचित कार्यवाहीस्त्तव:-

उपआयुक्त (प्रशासन),एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,नवी मुंबई

सहायक आयुक्त (प्रशासन),एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय,नवी मुंबई

सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मवबावि), जिल्हा परिषद

निवड नस्ती/का-७

२१)

दूरध्वनी क्र.०२२- २२८८०३११
मेल आयडी - wcd-desk07@gov.in

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग,
नवीन प्रशासकीय भवन, तिसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू
चौक,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

---

मबाआ-२०२१/प्र.क्र.२२/का-७ दिनाक:- २३ जानेवारी,२०२५

प्रति,
आयुक्त,
एकात्मिक बाल विकास सेवा योजना,
नवी मुबई

विषय:- मुख्यसेविका/पर्यवेक्षिका संवर्गात निवडीव्दारे नियुक्ती करण्याकरीता मर्यादित विभागीय परीक्षाबाबत मार्गदर्शन मिळण्याबाबत.

सदर्भ:- आपल्या कार्यालयाचे पत्र क्र. एबाविसेयोआ/गट-कसवर्ग/मलोआ/कका-पदभरती/ माहिती/२०२४-२५/६९६५/नवी मुंबई, दि.२४.१२.२०२४

उपरोक्त सदर्भाधिन पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

२. आपल्या कार्यालयाने सदर्भाधिन पत्रान्वये अगणवाडी सेविका सवर्गातून मुख्यसेविका/पर्यवेक्षिका सवर्गात निवडीव्दारे नियुक्ती करण्याकरीता मर्यादित विभागीय परीक्षा टी.सी.एस कपनी किवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात यावी किवा कसे याबाबत मार्गदर्शन मिळण्याबाबत विनती केली आहे

३. दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड सवर्गातील पदे सरळसेवेने भरताना स्पर्धा परीक्षा टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (टिसीएस-आयओएन) व इन्स्टीट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन (आय.बी.पी.एस.) या कपन्यामार्फत ऑनलाईन पध्दतीने घेण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनाक २१/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर सरळसेवेने भरावयाची पदे टप्प्याटप्याने महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास सामान्य प्रशासन विभागाच्या दिनाक १८/०७/२०२४ च्या शासन निर्णयाव्दारे तत्वत: मान्यता देण्यात आली आहे.सामान्य प्रशासन विभागाच्या उपरोक्त सूचना ह्या सरळ सेवेच्या पदासाठी आहेत.

मानसेवी अंगणवाडी सेविका" किवा "मिनी अगणवाडी सेविका" या पदावरुन मुख्यसेविका / पर्यवेक्षिका या पदावर निवडीव्दारे नियुक्ती करण्याकरीता, मर्यादित विभागीय परीक्षा कशा घ्यायच्या याचा निर्णय घेण्यास प्रशासकीय विभाग सक्षम आहे.

तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक १८/७/२०२४ मधील परिच्छेद क्र.६ मध्ये ज्या प्रशासकीय विभागाचे यापूर्वी कपन्याशी करार होऊन पदभरती प्रक्रिया सुरु झाली आहे किवा ज्या विभागाना रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे अशा प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाच्या दिनाक २१/११/२०२२ अनुसार कंपन्यांमार्फत पदभरतीची कार्यवाही विभागस्तरावर करता येणे शक्य आहे.

४. त्यामुळे अंगणवाडी सेविका संवर्गातून मुख्यसेविका/पर्यवेक्षिका सवर्गात निवडीव्दारे नियुक्ती करण्याच्या अनुषगाने यापूर्वी केलेल्या करारानुसार मर्यादित विभागीय परीक्षा टी.सी.एस कपनी याच्यामार्फत आयोजित करण्याबाबतची कार्यवाही तातडीने करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी शासनास अवगत करण्यात यावे.

(वि.रा.ठाकूर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन